
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क. १२९५०
IRBK-0112950



# असे होते गांधीजी

यशवंत जोशी

जो. क्र. १२९५०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
'८० ३४२०
२२।११।६९

# असे होते गांधीजी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ६०६८० दि. ...
क्रमांक ३४२० नोंद दि. २८।११।६९

लेखक :

यशवंत जोशी

IRBK-0112950

प्रकाशक :
इंडिया पब्लिशिंग हाऊस
२५१ कामदार चेंबर्स
सायन ( पूर्व ) मुंबई २२

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण, पुणे ३०

किंमत २ रुपये

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा क्र. २२८५१ नों दि ........
वि. ८४१-८१ ........

वर्ग =
अनुक्रम ९०७८०
क्रमांक 3020 ... प्रा. वा.
नों. दि. २८।११।६८

# नि वे द न

महात्मा गांधींचं जीवन म्हणजे महासागरासारखं होतं. त्यातील काही बिंदू मी इथं बालगोपाळांसाठी वेचलेले आहेत. साधारणतः प्राथमिक शाळांतील मुलांना गांधीजींच्या गोष्टी सोप्या भाषेत सांगाव्या, आणि त्या सांगताना मुलांतील उपजत सद्गुणांची जोपासना करता आली तर तीही साधावी असा दुहेरी हेतू या मागं आहे. भाषा साधी, गोष्टी छोट्या, भरपूर चित्रे अशी योजना आहे. त्यामुळे मुलांना त्या आवडतील अशी आशा आहे. कुठंही पांडित्यप्रदर्शनाचा आव आणलेला नाही. गांधीजींच्या विचारांची त्यांच्याच शब्दांत ओळख व्हावी म्हणून भरपूर अवतरणं दिली आहेत. ती बहुतेक सुभाषितवजा आहेत. त्यामुळं विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होईल.

सदरहू पुस्तक लिहीत असताना नवजीवन ट्रस्टनं प्रकाशित केलेल्या गांधी वाङ्मयाचाच मी प्रामुख्यानं उपयोग केला आहे. त्यामुळं त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं माझं कर्तव्य आहे.


माझे मित्र श्री. नरेंद्र मलिक यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनाची कामगिरी स्वीकारली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझे विद्यार्थी मित्र व मराठी बालगोपाळ मंडळी या पुस्तकाचं स्वागत करतील अशी आशा करून मी हे निवेदन संपवितो.

वसई,
ता. १८।६।१९६९

—य. ग. जोशी

| | |
|---|---|
| बालमोहन | १ |
| सत्याचं फळ | ३ |
| कॉपी | ५ |
| श्रावण बाळ | ७ |
| शपथ | ९ |
| मीठ खाणं सोडलं | ११ |
| बापलेकाचा सत्याग्रह | १३ |
| काळे गोरे भेद | १५ |
| डामडौलापासून दूर | १७ |
| पंचा धारण केला | १९ |
| चमत्कारिक पाहुणा | २१ |
| तर मग बसा आणि निवडा गहूं | २३ |
| अतिथि सत्कार | २५ |
| प्रेमाची किंमत | २७ |
| खेळ | २९ |
| मृत्यूशी मैत्री | ३१ |
| मुस्कटांत मारून घेतलं | ३३ |
| रोग्याची सेवा | ३५ |
| काठीचा उपयोग | ३७ |
| दान की व्यापार | ३९ |



# बालमोहन

मुलांनो, तुम्हांला गांधीजींचं संपूर्ण नाव काय होतं ते माहीत आहे का ? त्यांचं नाव होतं मोहनदास करमचंद गांधी. त्यांच्या आईचं नाव होतं पुतळाबाई. आपल्या भारताला गांधीजींनी स्वातंत्र्य मिळवून दिलं. सत्यानं वागावं, परस्परांवर प्रेम करावं, हिंसा करू नये अशी शिकवण त्यांनी आपल्याला दिली.

बाळ, बंडू, गोट्या, छोट्या अशी टोपणनावं आपल्याकडं मुलांना लहानपणी लाडानं ठेवतात. पुढं मोठं झाल्यावर ती जातात. काही वेळा राहतात सुद्धा. गांधीजींनाही लहानपणी असंच एक नाव होतं. त्यांचे आईवडील त्यांना ' मोनिया ' म्हणत. आपण छोट्या गांधींना ' बालमोहन ' म्हणू या. आवडलं ना तुम्हांला हे नाव ?

मुलांना खेळ खूप आवडतो. पण बालमोहनला मात्र खेळ आवडत नसे. हं. पण त्याला झाडावर चढणं मात्र आवडे. त्याला झाडांची फार हौस. लहानपणी हनुमानाप्रमाणं तो या झाडावरून त्या झाडावर असा सारखा उड्या मारीत राही. या धडपडीत कित्येकदा तो पडे. त्याला लागे. खरचटे. तरीपण त्यानं हुप्प हुप्पचा खेळ काही सोडला नाही.

एकदा काय झालं, बालमोहन झाडावर चढला होता. तो एका फांदीवर बसला व त्यानं पाय खाली सोडले. इतक्यात त्याचा दादा तिथं गुपचूप आला आणि त्यानं बालमोहनचे पाय खेचले. तो धाडकन झाडावरून पडला. रडत रडत तो आईजवळ गेला. त्यानं आईला दादाचं नाव सांगितलं.

आई हसली व म्हणाली, " अरे, त्यानं तुझी खोडी काढली तर तू त्याला दोन ठोसे दे. म्हणजे फिटंफाट झाली. "

त्यावर बालमोहन काय बोलला ठाऊक आहे तुम्हांला ? तो म्हणाला, " वा ग ! आई तू ? अग, दादा माझा मोठा भाऊ आहे. मोठ्या भावाला लहान भावानं कधी मारायचं असतं का ? "

आई मुद्दाम म्हणाली, " मग त्यांत काय झालं ? तू तर अजून लहान आहेस. लहानपणी भाऊ भाऊ अशी लठ्ठालठ्ठी करतातच. की. "

बालमोहन छाती पुढं काढून ताठ उभा राहिला. आणि आईला म्हणाला, " अशी कशी ग तू आई ? जो मारतो त्याला दम नाही देत. आणि मलाच उलट मी करू नये ते करायला सांगतेस. "

त्याच्या या उत्तरानं पुतळाबाईंनी बालमोहनला जवळ ओढून घेतलं व मांडीवर बसवून त्याचे खूप पापे घेतले. त्याच्या डोक्यावरून, पाठीवरून हात फिरवून त्याचे खूप लाड केले. " माझ्या राजा, अशा छान छान गोष्टी कुठून रे शिकून येतोस बाळा ? "

आईच्या प्रेमानं बालमोहन भावानं खोडी काढल्याचं विसरला व हसू लागला.

तेव्हा मुलांनो, जे वाईट असेल त्याला गांधीजींचा लहानपणापासून विरोध असे. कोणी कितीही मोठा असो, तो चुकीच्या मार्गानं जात असेल तर गांधीजी विरोध करत. हा सद्गुण तुम्ही आम्हीही अंगी आणू या.



## सत्याचं फळ

बालमोहनला खेळ आवडत नसे. शाळेत त्यानं खेळात कधी हौसेनं भाग घेतलाच नाही. खेळाच्या तासाला गैर-हजर राहिलं तर दंड द्यावा लागे.

एकदा काय झालं, पाऊस खूप पडत होता. आकाशात म्हातारी जोरजोरानं ढोल बडवीत होती. दिवस असून

देखील रात्रीसारखा अंधार पडला होता. बालमोहनजवळ घड्याळ नव्हतं. त्यामुळं किती वाजले आहेत याचा अंदाज करता येत नव्हता. त्यामुळं बालमोहनला खेळाच्या मैदानावर पोहोचायला उशीर झाला.

त्याला उशीर झालेला पाहून तालिम मास्तरांनी कारण विचारलं. बालमोहननं खरं कारण सांगितलं. पण मास्तरांचा त्यावर विश्वास बसेना. त्यामुळं त्यांनी बालमोहनला उशीर झाल्याबद्दल दंड केला.


त्यावर तो रडू लागला. त्याच्या एका मित्रानं त्याला रडतांना पाहिलं. तो त्याच्याजवळ जाऊन समजूत घालू लागला, "अरे वेड्या, रडतोस कशाला? तुझे वडील तर चांगले श्रीमंत आहेत. ते तुला दंड भरायला सहज पैसे देतील."

यावर बालमोहननं उत्तर दिलं ते मोठं मार्मिक आहे. तो म्हणाला, "अरे, एक आणा दंड झाला म्हणून मी रडत नाही. वाईट वाटतं ते मास्तरांनी मला खोटारडा ठरवलं याचं. त्यामुळं रडू येतं."

तालिम मास्तर तिथंच उभे होते. त्यांनी दोन मित्रांतील संवाद ऐकला. त्यांचा बालमोहनच्या सांगण्यावर विश्वास बसला. त्यांनी दंड एकदम माफ करून टाकला.

मुलांनो, गांधीजी नेहमी सत्यानं वागले. सत्याची कास त्यांनी धरली म्हणून ते महान झाले. मोठे ठरले. महात्मा बनले.

म्हणून बालगोपाळांनो, गांधीजी नेहमी म्हणतात की सत्य हाच खरा सद्‌गुण आहे. तुमच्यात तो असेल तर त्याचं फळ तुम्हांला निश्चित मिळेल. लोक आपोआप तुम्हाला चाहतील.



## कॉपी

मुलांनो, परीक्षेत कॉपी करणं फार वाईट नाही का? तरीपण बरीच मुलं कॉपी करतात. गांधीजींची अशीच एक कॉपीसंबंधीची आठवण आहे. ती सर्व मुलांनी लक्षांत ठेवली पाहिजे.

गांधीजींचं हायस्कूलमधील ते पहिलं वर्ष होतं. शाळेची तपासणी करण्याकरिता मि. गाइल्स नावाचा एक शिक्षणाधिकारी आला होता. त्यानं पहिलीच्या मुलांना पाच शब्दांचं स्पेलिंग लिहायला घातलं. त्यात Kettle हा शब्द होता. गांधीजींनी त्या शब्दाचं स्पेलिंग चुकीचं लिहिलं. त्यांचे शिक्षक जवळच उभे होते. त्यांनी गांधीजींना खुणावलं व समोरच्या विद्यार्थ्याच्या पाटीवर पाहून स्पेलिंग सुधारण्यास सांगितलं. परंतु गांधीजींनी तिकडं लक्ष दिले नाही.

शिक्षक पर्यवेक्षक (सुपरवायझर) म्हणून आहेत. तेव्हा त्यांच्या देखत दुसऱ्याच्या पाटीवर पाहून लिहिणं योग्य नव्हे. ती कॉपी झाली. पाप झालं. शिक्षकांनी खुणावून उत्तेजन दिले तरी आपण ती चूक करता नये. म्हणून गांधीजींनी शिक्षकांचं ऐकलं नाही.

झालं, गांधीजींखेरीज वर्गातील सर्व मुलांची स्पेलिंग्ज सगळी बरोबर आली. गुरुजींनी गांधीजींना याबद्दल दोष दिला. परंतु 'मी कॉपी करण्याचं पाप करणार नाही' असं त्यांनी गुरुजींना स्पष्टपणं सांगितलं.

एवढं झालं तरी त्यांचा त्या शिक्षकांबद्दलचा आदर काही कमी झाला नाही. ते म्हणत की, वडील माणसांच्या चुकांकडं मी नेहमी दुर्लक्ष करीत असतो. त्यांचं ऐकावं एवढंच मी शिकलो आहे. त्यांच्यावर टीका करणं मला आवडत नाही. त्यांच्याकडं आदरानं पाहणं हे लहानग्यांचं कर्तव्य आहे.

मराठी



## श्रावण बाळ

बालमोहन पाचवीत होता. त्याच्या वडिलांनी “श्रावणकुमार” नावाचं नाटकाचं एक पुस्तक विकत आणलं. बालमोहननं ते पुस्तक अनेक वेळा मोठ्या आवडीनं वाचलं.

त्या नाटकात काय होतं ठाऊक आहे का तुम्हाला? श्रावण बाळ स्वतः सर्व कष्ट सहन करी आणि आईबापाची सेवा करी.


नाटक वाचताना बालमोहनला वाटलं मला श्रावण-बाळासारखं वागता येणार नाही का? मला श्रावण-बाळासारखी आईबाबांची सेवा करता येणार नाही का?

काही दिवस गेले. एक दिवस गावात एक सिनेमेवाला आला. एका बॉक्सला काच लावून सिनेमा तयार केला होता. चालता फिरता सिनेमा. त्यांत बालमोहननं श्रावण बाळाचं चित्र पाहिलं. आपले अंध आईबाप कावडीत घालून ती कावड श्रावण बाळानं खांद्यावर घेतली होती. तो त्यांना तीर्थयात्रेला घेऊन चालला होता. त्याचवेळी दशरथ राजाचा बाण येऊन त्याला लागला. तो जखमी झाला व नदीकिनारी पडला. त्यानं दशरथ राजाला सांगितलं, "महाराज, माझे आईवडील म्हातारे व आंधळे आहेत. पलीकडे झाडाखाली मी कावड ठेवली आहे. त्या कावडीत ते बसले आहेत. त्यांना खूप तहान लागली आहे. तेव्हा कृपा करून लवकर जा आणि त्यांना पाणी पाजा. माझी काळजी करीत बसू नका. मी तर आता काही जगत नाही."

या चित्राचा बालमोहनच्या मनावर खूप परिणाम झाला. त्यानं त्याच दिवसा-पासून जणू शपथ घेतली. आजपासून श्रावण बाळासारखा होणार.

आणि खरं सांगायचं म्हणजे त्या दिवसापासून तो श्रावण बाळासारखा वागू लागला. तो आईबाबांचं ऐकू लागला. त्यांची सेवा करू लागला. त्यांची चाकरी करण्यात तो दंग राहू लागला.

बाळांनो, म्हणून गांधीजी म्हणत की मी आईवडिलांच्या भक्तीला धर्म मानतो. लहानपणापासूनच मी श्रावण बाळाचा आदर्श डोळ्यापुढं ठेवला.......आईवडिलांचं ऋण इतकं मोठं असतं की मूल ते जन्मभर फेडू शकणार नाही.



## शपथ

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर गांधीजींनी बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला जायचं ठरवलं. तेव्हाची ही गोष्ट आहे. त्या काळच्या समजुतीनुसार घरातील वडील मंडळींचा याला

विरोध होता. ऐन विशीतील मुलाला इतक्या दूर पाठवायला आई तयार नव्हती. शिवाय परदेशात गेल्यावर मुलं विघडतात, असं तिला कळलं होतं. तिथं गेल्यावर मांस खावं लागतं, दारू प्यावी लागते आणि पर-स्त्रीशी संबंध येतो अशी तिची समजूत होती. त्यामुळं ती गांधीजींना पाठवायला तयार नव्हती.

परंतु गांधी घराण्याची हितचिंतक मंडळी होती; त्यांना वाटे या घराण्यातील एकानं तरी परदेशात जाऊन शिकावं आणि घराण्याचा नावलौकिक वाढवावा. म्हणून ती मंडळी सारखी प्रयत्न करीत होती.

शेवटी जैन साधू बेंचरजी स्वामी हे त्यांच्या आईस भेटले. तिची त्यांनी समजूत घातली व तिच्यासमोर गांधीजींकडून शपथ घेवविली की, 'परदेशात मी मांस, मदिरा व स्त्री या तीन गोष्टींना स्पर्शही करणार नाही.'

गांधीजींनी ही शपथ आईच्या पायावर हात ठेवून घेतली. तेव्हा आईनं त्यांना जायला परवानगी दिली.



## मीठ खाणं सोडलं

गांधीजींचं लग्न लहानपणीच झालं होतं. त्यांच्या बायकोचं नाव कस्तुर बा. त्या काळात बालविवाह रूढ होता. तो वाईट मानला जात नसे. कस्तुरबांना सर्वजण बा म्हणत. लग्नाच्या वेळी बाचं वय तेरा वर्षं सहा महिने होतं. गांधीजी बा पेक्षा सहा महिन्यांनी लहान होते.

एकदा बा खूप आजारी झाल्या. डॉक्टरांनी सांगितलं की; पंधरा दिवस जर यांनी मीठ बंद केलं तर त्या बऱ्या होतील. नाहीतर दुखणं वाढेल.

गांधीजींनी मीठ सोडण्याची गोष्ट कस्तुरबांना सांगितली. त्या क्षणभर विचारात पडल्या. मग म्हणाल्या, " मिठावाचून कसं चालणार हो ? मिठाशिवाय काही तरी घशाखाली उतरेल का ? "

यावर गांधीजी म्हणाले, " मीठ सोडण्यास काहीच हरकत नाही. मिठामुळं रक्त पातळ होतं."

" तुम्ही एकदा पहा बरं मीठ सोडून जातं का तुम्हांला अन्न ते ? " कस्तुरबा थोड्याशा घुश्यातच गांधीजींना म्हणाल्या.


" असं म्हणतेस तर पहा. डॉक्टरांनी मला सांगितलं नाही तरी मी आज-पासून तुझ्यासाठी मीठ खाणं सोडलं. बस्स, तुला वाटलं तर तू मीठ सोड नाहीतर नको. मी मात्र वर्षभर मीठ सोडलं. " बापूजींनी निश्चयपूर्वक बांना सांगितलं.

बांना स्वतःच्या बोलण्याचं खूप वाईट वाटलं. त्यांनी त्याकरिता वारंवार क्षमा मागितली; परंतु आपल्या वचनापासून परावृत्त होण्याचं गांधीजींना कधी ठाऊकच नव्हतं.

कस्तुरबांनी त्या दिवसापासून पंधरा दिवस मीठ वर्ज्य केलं होतं. परंतु बापूजींनीं मात्र अखेरपर्यंत मिठाचा त्याग केला.

किती महान हा बापूंचा त्याग ! बाळांनो, विचार करा. एक दिवस जर जेवणात मीठ नसलं तर तुम्ही जेवाल का ?

म्हणून गांधीजी म्हणत, " त्यागावाचून देशभक्ती नाही. कारण ज्या माणसात स्वार्थाची अथवा ग्रहण करण्याची भावना आली, तो माणूस वर चढूच शकत नाही."



## बापलेकाचा सत्याग्रह

एक दिवस काय झालं, गांधीजींचा मुलगा देवदास यानं एक निश्चय केला. कसला ? आठ दिवस मी अळणी खाईन. जेवणात मीठ वापरणार नाही.

दोन दिवस कसे तरी मन मारून त्यानं निभावून नेलं. तिसऱ्या दिवशी देवदास खिचडी खायला बसला. ते पाहून बापूजींनी त्याला त्याच्या प्रतिज्ञेची आठवण करून दिली.

किती झालं तरी देवदास लहानच. त्यानं अल्लडपणं सांगितलं, " मला जर खिचडी खावू दिली नाही तर मी काहीच खाणार नाही.

बापूंना याचं फार वाईट वाटलं. त्यांनी देखील निश्चय केला की, जोपर्यंत देवदास मला जेवायला सांगत नाही; तोपर्यंत मी देखील अन्न घेणार नाही.

बाप-लेकांमध्ये सत्याग्रह सुरू झाला. दोघंही आपल्या निश्चयाला चिकटून राहिले. शेवटी तिसऱ्या दिवसानंतर देवदासला बापूजींच्या पुढं नमावं लागलं. तो म्हणाला, " बरं तर, मी अळणी जेवण घेण्यास तयार आहे. पण बापूजी, तुम्ही अन्नसत्याग्रह सोडा. "

देवदासनं आपल्या प्रतिज्ञेचं पालन करण्याचं आश्वासन दिलं तेव्हा गांधीजी जेवले.

शिस्तीच्या बाबतीत गांधीजी शिळेप्रमाणं दृढ होते. दुबळेपणा व भित्रेपणा त्यांना अजिबात आवडत नसे. त्यांचं म्हणणं असं की, एक तर माणसानं प्रतिज्ञा करू नये. ती करा अशी कुणावर सक्ती नाही. पण जर केलीच तर ती शेवटपर्यंत पाळा.

बापूजी म्हणत, " ही सारी सृष्टी एका दैवी शक्तीवर चालत आहे. सूर्य, चंद्र, आकाश, समुद्र, पर्वत आणि आपल्या डोळ्यांना दिसणारी सारी नक्षत्रं ही सर्व एका नियमानं चालत आहेत. आणि आपापली मर्यादा उल्लंघीत नाहीत. त्याचप्रमाणं माणसानं देखील सर्व कामकाजात नियमाचं, शिस्तीचं पालन बिनचूक करायलाच हवं. "

क्रमांक.................नोंद दि..................



# काळे गोरे भेद

बालमोहन आता मोठा झाला होता. त्याला इंग्लंडला शिकण्यासाठी पाठविलं. तीन वर्षं तो तिथं राहिला. आणि बॅरिस्टर होऊन आला. मुंबईमध्ये वकिली सुरू केली.

दक्षिण आफ्रिकेत दादा अब्दुल्ला नावाचे एक मोठे व्यापारी होते. त्यांची मोहनदासच्या दादांबरोबर मोठी मैत्री होती.

त्यांचा एक खटला दक्षिण आफ्रिकेतील कोर्टात चालू होता. त्यांना एक चांगला वकील हवा होता. या खटल्याचं वकिलपत्र स्वीकारून मोहनदास दक्षिण आफ्रिकेत गेला.

मोहनदास आता चांगला तरणाबांड जवान झाला होता. तो रुबाबदार पोषाख घाली. अशा रुबाबदार पोशाखात तो वकिली करण्यासाठी कोर्टात हजर झाला. न्यायाधीश एक गोरा इंग्रज होता. त्याला वाटे रुबाबदार पोशाख घालून फिरणं, फक्त इंग्रज लोकच करू जाणे. इतरांचं ते काम नव्हे. नव्हे, त्यांनी तसं करूही नये. काळ्या माणसानं थाटामाटात राहिलेलं त्याला आवडत नसे. त्यानं मोहनदासला सांगितलं, " पगडी काढा आणि कोर्टाचा मान राखा. "

त्यावर मोहनदासनं ताड्कन उत्तर दिलं, " आपण म्हणत असाल तर एक वेळ मी कोर्टाची पायरी उतरेन, पण पगडी उतरवून माझी इज्जत कमी करून घेणार नाही. "

इंग्रज लोक मोठे वाईट. ते भारतीयांना माणसं मानायलाही तयार नव्हते. एकदा गांधीजी रेल्वेनं प्रवास करीत होते. डब्यात ते एकटेच होते.

काही स्टेशन निघून गेली. एका स्टेशनवर गाडी थांबली. तेव्हा एक इंग्रज त्या डब्यात आला. त्यानं डब्यात काळा माणूस बसलेला पाहिला. तो चिडला. तो तुच्छतेनं म्हणाला, " ए काळ्या माणसा, खाली उतर. ठाऊक नाही का हा पहिल्या वर्गाचा डबा आहे तो ? "

त्यावर मोहनदास म्हणाले, " माझ्याजवळ देखील पहिल्या वर्गाचं तिकीट आहे. शिवाय या डब्यातून मी तुझ्या आधीपासून प्रवास करतो आहे. "

" तिकीट घ्यायला काय लागतं ? " तो इंग्रज कडाडला, " पहिला वर्ग हा फक्त आम्हां गोऱ्या लोकांसाठी आहे. "

दोघात चकमक उडाली. पण मोहनदास काही डब्यातून खाली उतरले नाहीत. शेवटी त्या गोऱ्या माणसानं पोलिसाला बोलावलं. पोलिसानं गांधीजींना फरफटत डब्यातून खाली खेचलं आणि प्लॅटफॉर्मवर आदळलं. गाडी पुढं निघून गेली. गांधीजींनी सर्व रात्र स्टेशनवर घालविली.

गांधीजींना पावलोपावली गुलामगिरीचा अपमान सहन करावा लागला होता. त्यांना वाटे की गुलामगिरीपेक्षा मरण परवडलं. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची बाजी लावली व ते मिळवलं.



## डाम-डौलापासून दूर

गांधीजी दक्षिण आफ्रिकेत असतानाची गोष्ट. त्यांच्या सत्याग्रहाच्या बातम्या साऱ्या जगभर पसरल्या होत्या. याच दरम्यान त्यांना एकदा लंडनला जावं लागलं. साहजिकच लंडन-मध्ये शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना ही गोष्ट समजली. ते गांधीजींना भेटले. त्यांनी त्यांच्याशी विचारविनिमय करण्याची

इच्छा व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या सभेस हजर राहून चार शब्द बोलण्याचं गांधीजींनी कबूल केलं.

तेथील रिवाजानुसार कार्यक्रमापूर्वी मेजवानीचा बेत ठरला होता. विद्यार्थी जेवणाच्या तयारीत गढून गेले होते. कुणी स्वयंपाकघर झाडून साफ करीत होता, कुणी भाजी चिरीत होता, तर कुणी भांडी घाशीत होता. याप्रमाणं सर्वजण कामात गढून गेले होते. त्यांच्यात एक हाडकुळा अशक्त माणूसही काम करीत होता. तो सुद्धा एक भारतीयच होता. त्याला तिथं कुणी ओळखत नव्हतं. शिवाय तो कुणाशी बोलताना दिसत नव्हता. पण त्याचं काम मात्र अगदी मन लावून चाललं होतं.

संध्याकाळ झाली तसे लोक जमू लागले. त्या माणसांना चिंता पडली की पाहुणे अद्याप कसे आले नाहीत. त्यांच्या मनात विचार आला, गांधीजी आलेच नाहीत तर काय होणार आहे ?

थोड्या वेळानं एक विद्यार्थी पुढारी तिथं आला. त्यानं तरुणांमध्ये काम करणाऱ्या त्या अशक्त माणसास आदरपूर्वक नमस्कार केला. तिथं काम करणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांनी हे पाहिलं तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. दुपारपासून त्या तरुणांत मिसळून गांधीजी जेवणाखाण्याच्या तयारीस मदत करीत होते.

त्या विद्यार्थ्यांनी गांधीजींची क्षमा मागितली. ते म्हणू लागले, "आम्ही आपणाला पूर्वी पाहिलेलं नव्हतं, त्यामुळं ओळखलं नाही. आपणाला आम्ही उगीच त्रास दिला. आम्हांला क्षमा करा."

परंतु गांधीजींनी त्यांचं ऐकलं नाही. ते पूर्वीप्रमाणंच कामाला लागले. त्यांनी टेबलावर भांडी मांडली. जेवण देखील वाढले. जेवण झाल्यावर ते सभेचे अध्यक्ष झाले आणि त्यांनी सुरेख भाषण केलं.

मुलांनो, गांधीजींमध्ये खोटा बडेजाव नावालासुद्धा आढळणार नाही. सर्व कामं ते सारखी समजत. त्यांना दुसऱ्याची सेवा करणं खूप आवडे. "सेवा हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे" असं ते म्हणत.



## पंचा धारण केला

एकदा गांधीजी ओरिसात दौऱ्यावर होते. रस्त्यानं जात असताना त्यांना एक बाई भेटली. तिच्या शरीरावर एक जीर्ण शीर्ण कळकट लुगडं होतं. ते सुद्धा इतकं अपुरं होतं की, त्या बाईला धड लाजही राखणं कठिण जात होतं.

गांधीजींनी तिला विचारलं, "बाई, तू आपलं हे लुगडं धूत का नाहीस? माणसानं इतकं आळशी असणं बरं नव्हे."

त्या बाईनं लाजून मान खाली घातली व ती नम्रपणे म्हणाली, "बापूजी, आम्ही तर खेडवळ माणसं. आळस करून आमचं कसं चालेल? तुम्हांला काय सांगू? अंगावरील या पटकुराखेरीज माझ्याजवळ नेसायला दुसरं वस्त्र नाही. ते असतं तर नेसून हे वस्त्र धुवून टाकलं असतं."

त्या बाईचं उत्तर ऐकून गांधीजींचे डोळे भरून आले. ते विव्हळ होऊन म्हणाले, "हाय रे, आज माझ्या भारतमातेपाशी अंगभर वस्त्रदेखील नसावं ना? आजपासून मी देखील प्रतिज्ञा करतो की जोपर्यंत देश स्वतंत्र होत नाही, तोपर्यंत मी देखील अंगावर कपडा चढवणार नाही."

बस्, त्या दिवसापासून गांधीजींनी कपडे घालणं सोडून दिलं. गुडघ्यापर्यंतचा पंचा हाच फक्त त्यांचा पोषाख बनला. त्यांनी जणू लंगोटीच धारण केली म्हणा ना.

म्हणून गांधीजी म्हणत, "दीनदुबळ्यांना दिलासा देण्यासाठी काही तरी खूण आपल्यापाशी असायला हवी. आणि ती कुठली म्हणाल तर खादी आहे...... मला वाटतं खादी परिधान करणं म्हणजे स्वातंत्र्याचा बाणा धारण करणं आहे."



## चमत्कारिक पाहुणा

भारताला स्वातंत्र्य मिळालं नव्हतं तेव्हाची गोष्ट. गोलमेज परिषदेसाठी गांधीजी विलायतला गेले होते. तिथं पंचम जॉर्ज बादशहाला त्यांना भेटायचं होतं. गांधीजी राजवाड्यावर गेले. त्यांचा तोच नेहमीचा पोषाख होता. गुडघ्यापर्यंत पंचा, साध्या वहाणा आणि अंगावर चादर पांघरलेली.

राजवाड्याच्या दारावर पहारा द्यायला एक अधिकारी होता. त्यानं गांधीजींना प्रश्न केला, "आपण बादशहाला भेटायला आलात आणि हे असे कपडे अंगावर!"

ते ऐकून गांधीजी हसले व लागलीच त्याला म्हणाले, "राजेसाहेबांनीच इतके कपडे अंगावर चढवले असतील की ते आम्हां दोघांना पुरून उरतील. समजलास?"

हे उत्तर ऐकून तो अधिकारी गप्पच झाला.

लंडनच्या एका वर्तमानपत्रात यासंबंधी एक बातमी प्रसिद्ध झाली.

"गेल्या कित्येक वर्षात राजवाड्यावर असला चमत्कारिक पाहुणा कधी भेटीला आला नव्हता. त्याचा वेश तर अगदी बावळा आहे, पण वाणीत चातुर्याच्या [illegible] कला असून ती परिणामकारी आहे."

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी गांधीजींच्या अंगी बाणलेली होती. ते दिखाऊपणापासून हजारो हात दूर राहत. ते नेहमी सांगत की, आपल्या गरजा शक्य तितक्या कमी करण्याचा प्रयत्न करा.

ते म्हणत, "लोकसेवेच्या भावनेने समाजाची सेवा करणं म्हणजे तरवारीच्या धारेवरील कसरत आहे. लोक-सेवकाला स्तुती आवडते मग निंदा कानी पडताच त्यानं तोंड का वर कडू करावं?"



## तर मग बसा आणि निवडा गहू

गांधीजींचं नाव साऱ्या जगभर पसरलं होतं. त्यांनी आश्रम काढला होता. 'यंग इंडिया' आणि 'नवजीवन' ही दोन वर्तमानपत्रही त्यांनी सुरू केली होती.

एकदा एक तरुण गांधीजींना भेटण्यास आला. गांधीजी

आश्रमातील मित्रमंडळीबरोबर बसले होते. सर्वजण गहू साफ करीत होते. गांधीजीसुद्धा या कामात हातभार लावीत होते.

तो तरुण नीटनेटका पोषाख करून आला होता. त्यानं गांधीजींना सांगितलं, "बापूजी, देशाची सेवा करण्याची माझी इच्छा आहे. आपण मला काही तरी काम द्या."

मधूनमधून आपल्या उच्चतर शिक्षणाच्या बढाईच्या गप्पागोष्टीही तो संभाषणातून ऐकवीत होता. स्वतःची लायकी सिद्ध करण्यासाठी मोठमोठ्या गप्पा मारीत होता.

गांधीजींनी त्याचं सर्व म्हणणं ऐकून घेतलं. तो तरुण पुन्हा म्हणाला, "माझा देशाला खूप उपयोग होईल. 'यंग इंडिया' करिता मी लेख लिहू शकेन. आपल्यासाठी मी भाषणं तयार करून देईन. आपण मला एकदा देशसेवेची संधी देऊन पहा. मी प्रत्येक बाबतीत आपल्या कसोटीस उतरेन असा विश्वास वाटतो."

गांधीजींनी उत्तर दिलं, "मला आपल्यासारख्या माणसांची जरूर पडेल तेव्हा मी आपल्याला बोलावीन."

त्यावर तो तरुण निराश झाला व तो म्हणाला, "आपण आताच मला काही तरी काम सांगा ना. मी कुठलंही काम करू शकेन."

बापूजी म्हणाले, "तर मग बसा आणि निवडा पाहू गहू."

यामध्ये त्या तरुणाला आपला अपमान वाटला. कदाचित त्याच्या मनात आलं असेल की, माझ्यासारख्या शिकल्यासवरल्या माणसाला गहू निवडायला सांगणं म्हणजे केवढी मोठी चूक आहे. व तो तेथून निसटला.

मुलांनो, गांधीजींना माणसांची पारख फार चांगली होती. खरा सेवक कोण असू शकतो हे त्यांना माहीत होतं. काही न करता मोठेपणा मिरविणाऱ्या मंडळींना ते स्वतःच्या आसपासदेखील फिरकू देत नसत. त्यांच्याजवळ खराखुरा देशसेवकच टिकू शके. इतरांची डाळ शिजत नसे.



## अतिथि-सत्कार

गांधीजींचा आश्रम पाहण्यासाठी लोकांची सारखी रीघ लागलेली असे. दूर दूरहून लोक बापूजींच्या दर्शनासाठी येत असत.

एकदा एका घरंदाज कुटुंबातील एक बाई बापूजींच्या दर्शनासाठी आली. तिला बापूंचा आश्रम पहावयाचा होता. वेळ सकाळची होती.

बापूजींनी तिचं स्वागत केलं. ते म्हणाले, "आपण प्रथम स्नान वगैरे उरका आणि मग आश्रम पहा."

ती बाई म्हणाली, "मी तर गार पाण्यानं अंघोळ करते. म्हणजे माझा काही प्रश्न नाही. परंतु माझ्याबरोबरची मंडळी मात्र गरम पाण्यानं अंघोळ करणारी आहेत. त्यांच्यासाठी थोडंसं गरम पाणी मिळालं तर बरं होईल."

आश्रमात अद्यापपर्यंत माणसांची वर्दळ सुरू झाली नव्हती. बापूजी न्हाणी-घरात गेले. पाहतात तर पाण्याची सारी भांडी रिकामी आहेत. आश्रमात आलेल्या पाहुणे मंडळीसाठी पाणी तर पाहिजे. त्यांनी दोन कळशा उचलल्या आणि नदी-वरून भरून आणल्या. नंतर त्यांनी गुपचूप पाणीदेखील तापविलं.

पाहुण्यांच्या आंघोळी उरकल्या. तेव्हा दुसरी माणसं उठली. त्यांनी पाहिलं तर पाहुण्यांच्या आंघोळी वगैरे झालेल्या. विचारपूस केल्यानंतर कळलं की बापूजींनी स्वतःच सारं काम उरकलं होतं. सर्वांना वाईट वाटलं.

बापूजींना कुठलंच काम लहान अथवा हलकं वाटलं नाही. ते कुठल्याही कामासाठी दुसऱ्यावर कधी विसंबून राहिले नाहीत.

त्या पाहुण्या बाईला ही गोष्ट समजली तेव्हा तिला खूप वाईट वाटलं. खरंच, असा अतिथि-सत्कार तिच्या वाट्याला आणखी कुठं येणार होता?

गांधीजी म्हणत, "कुटुंबासाठी, परिवारासाठी, गावासाठी त्याग सर्वजण करतात. पण सर्वांसाठी जे त्याग करतात तेच खरे श्रेष्ठ होत."



# प्रेमाची किंमत

सारा देश गांधीजींवर प्रेम करीत होता. गांधीजींना याची जाणीव होती. लोकांच्या या प्रेमाला ते फार मान देत असत. हा लहान, हा मोठा असा भेदभाव त्यांच्या मनाला कधी शिवला नाही. विशेषतः त्यांचं मुलांवर फार प्रेम. मुलांवरील प्रेमानं तर ते स्वतःही विसरून जात असत.

एकदा ते मुंबईस आले होते. तेथील एका मारवाडी विद्यालयात ते उतरले होते. तिथं खूप मुलं येऊन त्यांना

भेटून गेली. काहींनी त्यांना प्रेमानं काही वस्तू भेटीदाखल दिल्या.

गांधीजींची परतायची वेळ झाली. ते आपलं सामानसुमान बांधू लागले. सर्व सामान बांधून झालं होतं. तरी पण ते काही तरी शोधीत होते. त्यांचं काही तरी हरवलं आहे. आणि त्यामुळं ते बेचैन आहेत; हे काका कालेलकरांच्या लक्षात आलं. त्यांनी विचारलं, " बापूजी, आपण काय शोधता ? "


त्यावर गांधीजी म्हणाले, " एक पेन्सिल होती हो. ती मिळत नाही. " बापूजींच्या वेळेची किंमत काकांना माहीत होती. ते म्हणाले, " एवढंच ना मग ही माझी पेन्सिल घ्या. "

बापूजींनी ती पेन्सिल घेतली नाही. ते म्हणाले, " नाही हो. मला तीच पेन्सिल मिळायला हवी. ती हरवण्याचा मला अधिकार नाही. मद्रासला गेलो असताना एका लहान मुलानं मोठ्या प्रेमानं ती मला भेट दिली होती. गेले कित्येक दिवस ती मी जपून ठेवली आहे. "

सर्वांनी शोधायला सुरुवात केली. तेव्हा ती सापडली. दोन इंचदेखील ती नव्हती. पण बापूजींनी ती जपून ठेवली होती. ती सापडली तेव्हा ते जायला निघाले.

बापूजींना प्रेमाची किंमत समजत होती. त्या लहान बालकानं खऱ्या प्रेमानं ती पेन्सिल त्यांना दिली होती.

म्हणून गांधीजी म्हणत, " पिता-पुत्र, भाऊबहीण, मित्र-मित्र यांच्यातील प्रेमाचं दर्शन आपल्याला वारंवार घडतं. परंतु प्रेम सर्व प्राणीमात्रावर करायला हवं. ते मर्यादित नको.



## खेळ

बापूजींचं वास्तव्य पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये होतं, तेव्हाची गोष्ट. त्यांच्या बरोबर आणखीही बरेच लोक होते. एक दिवस संध्याकाळी बॅडमिन्टनचा खेळ चालू होता. बापूजी देखील तिथं गेले. सरोजिनी नायडूंनी त्यांना खेळायचा

आग्रह केला. ते सुद्धा तयार झाले. नेटच्या एका बाजूला सरोजिनी नायडू उभ्या राहिल्या. दुसऱ्या बाजूला बापूजी उभे राहिले. त्यांनी रॅकेट डाव्या हातात घेतली.

खेळाला सुरुवात करणार इतक्यात नायडू हसल्या व म्हणाल्या, "बापूजी, तुम्ही रॅकेट तर डाव्या हातातच घेतली आहे?"

त्यावर बापूजी म्हणाले, "तुम्ही देखील रॅकेट डाव्या हातातच घेतली आहे."

"माझा उजवा हात दुखतो आहे म्हणून मी डाव्या हातानं खेळते." त्यांनी हसत हसत सांगितलं.

त्यावर बापूजी म्हणाले, "कुणाच्या अडचणीचा फायदा घेण्याचा माझा स्वभाव नाही आणि एखाद्या बाईच्या अडचणीचा तर नाहीच नाही. मी देखील डाव्या हातानं खेळणार."

त्यांचं हे उत्तर ऐकून सर्वांना हसू आलं. सर्व डाव बापूजी डाव्या हातानं खेळले.

पहा, बापूजींचं दुसऱ्याच्या अडीअडचणींकडं किती लक्ष असे. इवल्याशा कारणासाठी देखील ते दुसऱ्याच्या अडचणीचा विचार करीत असत.

ते नेहमी म्हणत. नियमावाचून कुठलंच काम होत नाही. एक क्षण जरी नियमाचा भंग झाला तरी सारं भू-मंडळ छिन्न भिन्न होऊन जाईल."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा



## मृत्यूशी मैत्री

स्पृश्यास्पृश्य, उच्चनीच हे भेद गांधीजींना पसंत नव्हते. ते नाहीसे करण्यासाठी ते सतत धडपडत होते. अनेक वेळा ते दिल्लीला जात असत. झकपक अशा या नगरीत येऊन देखील बापूजी राहायचे मात्र हरिजन वस्तीमध्ये किंवा गरीबांच्या झोपडीमध्ये.

एकदा असेच ते दिल्लीला गेले असताना नवी दिल्लीतील हरीजन वस्तीत राहिले होते. दिवस थंडीचे होते. बापूजींनी जमिनीवरच बिछाना टाकला होता व ते निजले होते. त्यांनी अंगावर रजई घेतली होती.

सकाळीच काही लोक बापूजींना भेटण्यासाठी हरिजन वस्तीत आले. ते उठून बसले तोच त्यांच्या रजईतून एक भला मोठा काळा नाग बाहेर पडला व पळू लागला. एका माणसानं काठी घेतली व तो नागाच्या मागं धावू लागला.

त्याला अडवीत बापूजी म्हणाले, " अरे, त्याला मारू नकोस. तो रात्रभर माझ्याजवळ राहिला होता तेव्हा तू कुठं होतास ? "

कुणालाच काही न करता साप निघून गेला.

बापरे ! बापूजींचा किती दृढ विश्वास होता आपल्या अहिंसा तत्त्वावर रात्रभर मृत्यू त्यांच्या जवळ राहिला. परंतु त्यांचं तो काहीच वाईट करू शकला! नाही. जणू काही बापूंनी मरणाशी खरोखरच मैत्री केली होती.

बापूजी म्हणत, " अहिंसेची वाट तरवारीच्या धारेसारखी दुधारी आहे, जराशी चूक घडली की तुमचं पतन झालंच म्हणून समजा. तुमच्यावर कोणी कितीही घोर अन्याय केला तरी त्याच्यावर रागावू नका. उलट त्याच्यावर प्रेम करा. त्याचं हित चिंता आणि हितच साधा. तसंच प्रेम करतांना सुद्धा अन्यायाच्या आहारी जाऊ नका. अन्यायाला विरोध करा. आणि तसा विरोध करीत असता तुम्हांला जो त्रास होईल तो धैर्यानं सहन करा. त्रास देणाऱ्याविषयी मनात द्वेष-भावना ठेवू नका.



## मुस्कटात घेतलं मारून

बापूजींच्या आश्रमातील एक नियम असा होता की झाडावरील फूल कोणाही विद्यार्थ्यानं तोडायचं नाही.

एकदा काय झालं की झेंडूची काही फुलं जमिनीवर पडलेली बापूजींना आढळली. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना जवळ बोलावलं आणि विचारलं, "ही फुलं कोणी तोडली?"

कुणीही स्वतःचा अपराध कबूल करायला तयार होईना. बापूजींना खूप वाईट वाटलं. त्यांनी स्वतःच्याच गालावर दोन-चार फटके मारून घेतले. आणि ते विद्यार्थ्यांना म्हणाले, "माझ्यानच निश्चित काही तरी उणीव आहे. म्हणून तर तुम्ही लोक आश्रमात राहून देखील खरं बोलू शकत नाही."

तेव्हा एक विद्यार्थी चटकन् पुढं आला. त्यानं रडत रडत बापूजींचे पाय पकडले व रडतच सांगू लागला, "बापूजी, फूलं मी तोडली होती, मला क्षमा करा."

कुणाला सुधारायचं असेल तर बापूजी त्याला शिक्षा करीत नसत. धाक धपटशा, ताडन-मारन् यावर त्यांचा विश्वास नव्हता. ते दुसऱ्यासाठी स्वतः संकटं झेलायला पुढं होत. त्याचा परिणाम दुसऱ्याच्या मनावर चटकन होई. अशा प्रकारे प्रेमानं ते अपराध्याला जिंकीत असत.

गांधीजी म्हणत, "चूक ही प्रत्येक माणसाकडून होते. चूक लक्षात येताच ती मान्य करून दूर करून टाकावी व पापातून मुक्त व्हावं. माझ्या आयुष्यात मी असं अनेक वेळा केलं आहे. आपण कधी चूक करणारच नाही अशी स्वतःची समजूत करून घेण्याची चूक मात्र माणसानं कधी करू नये."



## रोग्याची सेवा

उन्हाळ्याचे दिवस होते. आश्रमाच्या हिरवळीवर गांधीजी झोपले होते. रात्री एक दोनचा सुमार असेल. एकाएकी त्यांना जाग आली. कुणाच्या तरी रडण्याचा आवाज त्यांच्या कानांवर येत होता.


बापूजी उठले. आश्रमाच्या बाहेर रस्त्यावर आले. काही अंतर चालल्यानंतर त्यांना एक दीनदुबळा माणूस कण्हताना आणि रडताना दिसला. त्याला विंचू चावला होता व तो वेदनेनं विव्हळत होता.

बापूजींनी त्याला उठवलं. आणि बरोबर चलण्यास सांगितलं. पण तो तयार होईना. उलट सहानुभूतीचे शब्द ऐकून त्याला अधिकच वाईट वाटले व त्याचा कंठ दाटून आला आणि तो रडू लागला. तरी पण बापूजींनी त्याला आधार दिल व ते त्याला घेऊन आश्रमात आले. तिथं आणल्यावर बापूजींनी त्याच्या जखमेवर औषध लावलं. त्याच्यासाठी बिछाना घातला व त्याला आराम करायला सांगितलं. रात्रभर ते त्याच्या बिछान्याशीं बसून होते. त्याला ते मधून मधून थोपटीत होते आणि धीर देत होते.

सकाळपर्यंत त्याच्या वेदना कमी झाल्या. बापूजींनी त्याला खायला प्यायला घातलं. दुपारपर्यंत तो ठणठणीत बरा झाला. तरीपण संध्याकाळी बापूजी याला घरापर्यंत सोडायला गेले.

कुणी रोगी किंवा आजारी दिसला, की बापूजींच्या मनात दयेचा सागर उचंबळून येई. ते सर्व काम बाजूला सारीत व रोग्याच्या सेवेत गढून जात.

गांधीजी म्हणत, "जिथं दया नाही तिथं अहिंसा नाही. दयेविना धर्म म्हणजे पाखंड आहे. दया हेच धर्माचं मूळ आहे. जो दया सोडतो तो देवालाही सोडतो."



## काठीचा उपयोग

जेव्हा पहावं तेव्हा बापूजींच्या भोवती लोकांचा घोळका दिसे. लोक त्यांना तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न विचारीत. काही राजकारणासंबंधी असत. तर काही देशांचं दारिद्र्य दूर कसं करावं यासंबंधी असत. काहीजण तर अगदी घरगुती गोष्टीतही

त्यांच्याशी विचारविनिमय करीत. त्यात काही प्रश्न तर अगदी पोरकट व निरर्थक देखील असत. काही प्रश्न विनोदी असत. जसा प्रश्न असेल तसं त्याला बापूजी उत्तर देत. विशेषत: विनोदी प्रश्नाला ते मोठं मजेशीर उत्तर देत असत.

एकदा ते विश्रांती घेत होते. जवळच त्यांच्या हातात नेहमी असणारी काठी होती. आश्रमातील बरीच मंडळी त्यांच्या आसपास बसली होती. इकडच्या-तिकडच्या गप्पा चालल्या होत्या.

इतक्यात जवाहरलाल नेहरू तिथं आले. त्यांनी पाहिलं तर सगळीजण मोठी मजेत हसत खिदळत आहेत. फक्त बापूजीच तेवढे गप्प बसून आहेत. बापूजींनाही हसवावं असं त्यांना वाटलं.

ते हळूच बापूजींच्या जवळ गेले. आणि गंभीरपणाचा आव आणून म्हणाले, "बापू, आपण अहिंसेचे पुजारी आहात. हत्याराच्या विरुद्ध आहात. मग आपल्यापाशी ही काठी कशाला हो? ही कुणाला मारण्यासाठी?"

बापूजी समजले. ते हसले व म्हणाले. "या काठीचा फार मोठा उपयोग आहे. मी ही जवळ ठेवली आहे, ती तुमच्यासारख्या नाठाळ मुलांना वठणीवर आणण्यासाठी." हे ऐकून सारीजण खदखदून हसली.

गांधीजी म्हणत, "अहिंसेचा अर्थ आहे अनंत प्रेम. कष्ट सहन करण्याची अपरंपार शक्ती. अहिंसा हा परमधर्म आहे. सत्याशिवाय दुसरा धर्म नाही."



## दान की व्यापार ?

बापूजींच्या जवळ सर्व तऱ्हेचे लोक येत असत. त्यात पुढारी असत. शेट-सावकार असत. कार्यकर्ते असत आणि सामान्य नागरिक असत. एकदा एक शेटजी त्यांच्याकडं आले. प्रथम थोड्या इकडतिकडच्या गप्पा झाल्या. नंतर बापूजींकडं तक्रार करावी अशा प्रकारं ते सांगू लागले, "बापूजी, जग बघा किती बेइमान आहे ते! मी पन्नास हजार रुपये देणगी देऊन एक धर्मशाळा बांधली आणि आता ती तयार झाल्यावर नियंत्रण समितीतून मलाच काढून

टाकलं आहे. धर्मशाळा नव्हती तोपर्यंत कुणीही माईचा लाल पुढं आला नाही. पण बांधून तयार होताच पन्नास माणसं अधिकार सांगायला पुढं धावली."

शेटजींचं बोलणं बापूजींनी शांतपणे ऐकून घेतलं. नंतर ते म्हणाले, "शेटजी, तुमच्या वाट्याला ही निराशा आली कारण दानाचा खरा अर्थ तुम्हांला समजला नाही. एखादी गोष्ट द्यायची व तिच्या मोबदल्यात कशाची तरी अपेक्षा करायची म्हणजे दान नव्हे. तो व्यापार आहे. आणि जर तुम्ही व्यापार केला असेल तर त्यात तुम्हांला जसा नफा आहे तसं नुकसानही आहे."

त्यावर शेटजी पुढं काहीच बोलू शकले नाहीत. त्यांनी बापूजींना नमस्कार केला व ते तेथून लगबगीनं निघून गेले.

गांधीजी म्हणत, "ज्या दानामुळं स्तुति-सुमनांचा वर्षाव होतो ते दान 'दान' राहात नाही. तर ते अहंकार आणि अवडंबर यांच्या पंक्तीत जाऊन बसतं."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ६०६८० वि
क्रमांक ... नोंद दि ...

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ७२८५६ नों दि
वि.

IRBK-0112950

## खास मुलांसाठीं आमची प्रकाशने

■ ■

| | | |
|---|---|---|
| १. | असे होते चाचा नेहरू | २–४० |
| २. | असे होते गांधीजी | २–०० |
| ३. | अशी होती कस्तुरबा | २–०० |
| ४. | गुणी प्रकाश | २–०० |
| ५. | छोटा जवान | |

### – आणि थोरांसाठी –

| | | |
|---|---|---|
| १. | दिल्लीतली दहा वर्षें | ६–०० |
| २. | माझे पति माझे दैवत | ६–०० |

■ ■

इंडिया पब्लिशिंग हाऊस
२५१, कामदार चेंबर
सायन ( पूर्व ) मुंबई २२

